# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००४०४**

**अपिलार्थी श्री. कृष्णा सी. गुप्ता**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**

आर्थिक गुन्हे विभाग, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालयीन आवार
नवीन इमारत, तिसरा माळा, मुंबई-४०० ००१.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (आर्थिक गुन्हे-२)**

आर्थिक गुन्हे विभाग, पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे कार्यालयीन आवार
नवीन इमारत, तिसरा माळा, मुंबई-४०० ००१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १४.०८.२०२१ | १८.०९.२०२१ | ०१.१०.२०२१ | ०८.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १९.०१.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये हवी असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. १८.०९.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०८.११.२०२१ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. १४.०८.२०२१ अन्वये मिरा रोड पोलीस ठाणे (तत्कालीन ठाणे ग्रामीण जिल्हा) येथे दिनांक २९.०९.२०१९ रोजी दाखल असलेल्या गुन्हा रजि. क्र. २१७/२०१९ या गुन्ह्याचा तपास शासनाच्या आदेशान्वये आर्थिक गुन्हे शाखा (EOW) मुंबई या कार्यालयात तपासासाठी वर्ग करण्यात आले होते. तथापी त्यानंतर मा. सुप्रिम कोर्टाच्या आदेशान्वये सदर FIR रदद झाले. असे समजले आहे. करीता सदर बाबत EOW मुंबई कार्यालयामार्फत सदर तपास करणारे अधिकारी यांचे नाव व हुददा मिळावा, अशी माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. १८.०९.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना आगुवि मुंबई येथील सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक मंदार लाड/कक्ष - ४ ज.चि. ४ हे करीत होते. सदर FIR हा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने रद्द करण्यात आला आहे व त्याबाबतचा अहवाल मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई येथे सादर केलेला असल्याने अर्जदारास पाहिजे असलेली माहिती उपरोक्त मा. न्यायालयातुन घेता येईल. असे कळविले आहे. ..२/-

अपिलार्थी यांनी दि. ०१.१०.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०८.११.२०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाचे प्रथम खबरी अहवाल सादर करणेबाबत आदेशाची प्रत तसेच सदर आदेशाची प्रत मा. अतिरिक्त मुख्य महानगर दंडाधिकारी, ४७ वे न्यायालय, मुंबई यांचे न्यायालयात तपासी अधिकारी यांनी त्यांचे अहवालासह सादर केले त्या अहवालाची प्रत अभिलेखावर उपलब्ध असल्यास अपिलार्थी यांना ७ दिवसांच्या आत सदर प्रथम खबरी अहवाल रद्द आदेश व न्यायालयात सादर केलेल्या अहवालाची साक्षांकीत प्रत विनामूल्य देण्यात यावी, असे आदेश पारीत केले आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींना प्रथम दिनांक १८.०९.२०२१ रोजीच्या पत्राद्वारे माहिती दिली होती. त्यानंतर प्रथम अपिलाच्या आदेशानंतर दिनांक १३.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती व्यक्तीश: स्वीकारली असून दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात आली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८.११.२०२१ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे दिनांक १३.११.२०२१ रोजी प्रभारी पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे विभाग यांनी अपिलार्थी यांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची प्रत दिली आहे. माहिती मिळाल्याबाबत अपिलार्थी यांची पोहोचपावती अभिलेखावर उपलब्ध आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपिलार्थींना माहिती दिली आहे. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास 24-4-2024

**मुंबई**
**दिनांक : २४.०४.२०२४**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**